जा.क्र.उमाशि-३/११ वी प्रवेश/पुवि/२०१४/2599/92
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : ३१/१/२०१४

1 FEB 2014

प्रति

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसर

विषय : इयत्ता ११ वी ऑनलाईन पध्दतीने केंद्रिय प्रवेश सन २०१४-१५ सहविचार सभा.

संदर्भ :- शासन पत्र क्रं. संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२३६/१३/एसडी-२ दिनांक ८/१/२०१३

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाविष्ठ कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश ऑन लाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत. या संदर्भात मा. सहसचिव (विद्यार्थी विकास) शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्यांची सहविचार सभा दिनांक १३/१/२०१४ रोजी झाली. तसेच पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व कटक मंडळे क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची सहविचार सभा दिनांक २०/१/२०१४ रोजी 'राजीव गांधी ॲकॅडमी ई-लर्नींग स्कूल शिवदर्शन, सहकारनगर, मित्रमंडळ चौकाजवळ, पुणे' येथे झाली.

या संदर्भात दिनांक ७/२/२०१४ रोजी सर्व **प्राचार्यांची** ऑनलाईन प्रवेशासंबंधीची बैठक सकाळी ११.०० वाजता **"असेंब्ली हॉल, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे"** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर बैठकीस स्वत: प्राचार्यांनी उपस्थित रहावयाचे आहे. यानंतर माध्यमिक शाळां **मुख्याध्यापकांची** सहविचार सभा त्याच ठिकाणी **दुपारी २.३० वाजता** आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस माध्यमिक शाळां संलग्न उच्च माध्यमिक प्राचार्य, तथा मुख्याध्यापक यांनी उपस्थित रहावयाचे आहे याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या (www.dydepune.com) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(सुमन शिंदे)
अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत- मा. शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्य) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १
प्रत - शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे
प्रत - कार्याध्यक्ष तथा प्राचार्य, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे
कृपया सदर मुख्याध्यापक सभेसाठी "असेंब्ली हॉल" येथे आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.